ठाणे, मंगळवार दि. २१ मे २०२४ | वर्ष : १३, अंक : २३, पाने : ४, किंमत : २ रुपये | Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026



लोकसभेचा संग्राम

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !®



मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध

संपादक : चंद्रकांत भोईटे

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**
कमाल ४१° से | किमान २८° से

**बाजार**
सोने ७१,०१० | चांदी ८१,८६०

**डोकं खाजवा** –अशोक सुतार

# धाकधूक वाढली...उद्या १ वाजता लागणार बारावीचा निकाल!

मुंबई: महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळाकडून फेब्रुवारी–मार्च २०२४ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवारी जाहीर होणार आहे. मंगळवारी दुपारी एक वाजता मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळासह विविध ठिकाणी विद्यार्थ्यांना हा निकाल पाहता येईल. मंडळाकडून निकालाच्या तारखेची घोषणा झाल्यानंतर आता सर्व विद्यार्थी आणि पालकांची धाकधूक वाढणार आहे. उद्याच्या निकालात काय होणार, याची उत्सुकता सर्वांना लागून राहिली आहे. विद्यार्थ्यांना उद्या दुपारी एक वाजता ऑनलाईन पद्धतीने निकाल पाहता येईल. त्यानंतर महाविद्यालयांमध्ये त्यांना गुणपत्रिका वितरीत केल्या जातील.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात परीक्षा घेण्यात आली होती. बारावीच्या परीक्षेसाठी १५ लाख १३ हजार ९०९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमध्ये ही परीक्षा आयोजित करण्यात आली होती. बारावीच्या निकालावर विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणाची दिशा ठरत असते. बारावीच्या टक्केवारीनंतर पुढे कोणत्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घ्यायचा किंवा (पान २ वर)

### बारावीचा निकाल कुठे पाहता येणार?

1. www.mahresult.nic.in
2. http://hscresult.mkcl.org
3. www.mahahsscboard.in
4. https://results.digilocker.gov.in
5. http://results.targetpublications.org

### ऑनलाईन निकाल कसा पाहाल?

- महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून बारावीचा निकाल ऑनलाईन जाहीर केला जाणार आहे
- निकाल पाहण्यासाठी शिक्षण मंडळाच्या www.mahresult.nic.in अधिकृत संकेतस्थळाचा किंवा अन्य वेबसाईटचा वापर करता येईल.
- वेबसाईटच्या होमपेजवर गेल्यानंतर महाराष्ट्र बोर्ड एचएससी निकाल २०२४ या ऑप्शनवर क्लिक करा.
- हा ऑप्शन क्लिक केल्यावर तुम्हाला समोर तुमचा सीट क्रमांक अथवा परीक्षा क्रमांक टाकण्याचा ऑप्शन दिसेल. काही संकेतस्थळांवर तुम्हाला रोल नंबर, शाळेचा कोड आणि इतर माहिती विचारली जाईल. ही माहिती भरुन सबमिट केल्यानंतर तुम्हाला तुमचा निकाल दिसेल.

## थोडक्यात घडामोडी

### ऐन मतदानाच्या दिवशी मध्य रेल्वेची वाहतूक रविवारच्या वेळापत्रकाने

ठाणे: लोकसभा निवडणुकीचे मतदान असल्याने मतदार मतदानासाठी बाहेर उतरला असतानाच मध्य रेल्वेने मतदानाच्या दिवशी रेल्वेची वाहतूक सुट्टीच्या वेळापत्रकाने सुरू केली आहे. पूर्वी मुंबईत राहणारे अनेक रहिवासी ठाणे किंवा त्यापल्याड राहण्यास गेले आहेत. परंतु त्यांचे मतदान मुंबई तसेच उपनगरात असते. परंतु मध्य रेल्वेचे वेळापत्रक रविवारच्या दिवसाचे असल्याने या मतदारांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील मतदान आजपासून सुरू झाले आहे. मतदानाच्या दिवशी नागरिकांना मतदान करता यावे यासाठी सुट्टी जाहीर करण्यात आले आहे. असे असले तरीही काही अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना कामानिमित्त बाहेर पडावे लागत असते. तसेच गेल्या काही वर्षांपासून मुंबई तसेच उपनगरात राहणारा मतदार पुनर्विकास तसेच राहण्यास स्वस्त पर्याय म्हणून ठाणेपल्याड राहण्यासाठी गेला आहे. यातील अनेकांचे मतदान हे त्यांच्या पूर्वीच्या वास्तव्याच्या ठिकाणी आहे. त्यामुळे हे मतदार देखील मतदानाच्या दिवशी बाहेर पडू लागले आहेत.

अत्यावश्यक सवेतील कर्मचाऱ्यांना मतदान केल्यानंतर त्यांच्या कामाच्या ठिकाणी जावे लागते. असे असतानाच मध्य रेल्वेने सोमवारी सुट्टीच्या म्हणजेच रविवारच्या वेळापत्रकानुसार वाहतूक सुरू केली आहे. त्याचा परिणाम मतदारांना सहन करावा लागत आहे. रविवारच्या वेळापत्रकानुसार वाहतूक होत असल्याने रेल्वे गाड्यांच्या प्रतीक्षा करत या मतदारांना स्टेशन परिसरात थांबावे लागत आहे.

## लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात सायं. 5 वाजेपर्यंत

# महाराष्ट्रात 48.66 टक्के मतदान





लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात आज (दि.२०) मुंबईतील ६ जागांसह राज्यातील १३ मतदारसंघात मतदान सुरु आहे. महाराष्ट्रात सायंकाळी ५ वाजेपर्यंत ४८.६६ टक्के मतदान झाले आहे. मुंबईतील सर्वजागांसह नाशिक, धुळे, पालघर, दिंडोरी, कल्याण, ठाणे, पालघर या मतदारसंघात मतदान सुरु आहे. महाराष्ट्रात सायंकाळी ५ वाजपर्यंत कोणत्या मतदारसंघात किती टक्के मतदान झाले? लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील मतदानाला मुंबई शहर जिल्ह्यातील ३१– मुंबई दक्षिण लोकसभा मतदारसंघात आज दि. २० मे २०२४ रोजी सकाळी ०७.०० वाजेपासून सुरुवात झाली. ३१ – मुंबई दक्षिण मतदारसंघातील एकूण ६ विधानसभा मतदारसंघात सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत अंदाजे सरासरी ४४.२२ टक्के मतदान झाले आहे.

## ठाण्यात बोगस मतदान ? मतदान केंद्रावर असुविधा, मतदारांच्या रांगा, प्रशासन ढीम्म

ठाणे – २५ ठाणे लोकसभा मतदार संघात मोठ्या शांततेत पार पडले कुठलाही अनुचित प्रकार घडला अनहि मात्र पारदर्शक निवडणुकीची मतदान प्रक्रियेला गालबोट लागणार्या अनेक घटना घडलेल्या आहेत. ठाणे लोकसभा मतदार संघात सत्ताधारी पक्ष आणि प्रशासकीय यंत्रणा यांच्या मिलीभागतीने जेष्ठ नागरिकांसह मतदारांची त्रेधापट उडवून दिली. तर प्रशासनाच्या वतीने मतदान केंद्र हे असुविधेचे आगर झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. तर बोगस मतदार याबाबत राष्ट्रवादीचे आमदार आणि मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार राजन विचारे यांनी आक्षेप नोंदवित आरोपही केले आहेत. तर मुंबरा परिसरात एटीएममध्ये मतदारांना पैशाचे वाटप होत असल्याचा शरद पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांनी आक्षेप व्यक्त केला. तर उमेदवार राजन विचारे यांनी याबाबत ठाणे पोलिस आयुक्त आणि निवडणूक आयोगाला निवेदने पाठविल्याची सूत्रांची माहिती आहे.

- ईव्हीम मशीन पडल्या बंद.. तर ईव्हीम मशीन झाल्या स्लो...मतदारांच्या रांगा
- बोगस मतदानासाठी १२०० लोक आल्याचा आव्हाड आणि उमेदवार विचारेचा आरोप
- मुंब्र्यात एटीएममध्ये मतदारांना पैशाचे वाटप ?

## ठाण्यात मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद...शांततेत मतदान पार पडले, मात्र आरोपांचा आला पुर

### मतदान केंद्र असुविधेचे केंद्र.... मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

ठाणे लोकसभा मतदारसंघात बहुतांश मतदान केंद्रावर मतदारांची मोठी असुविधा असल्याच्या तक्रारी खुद्द मतदार यांनी केल्या. मतदान केंद्रावर कुठल्याही प्रकारे दिव्यांग, अपंग किंवा जेष्ठ नागरिक यांना बसण्याची व्यवस्था नाही. उष्मयचा कहर असताना मतदारांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ही नसल्याचा आरोप मतदारणी केला. मतदान केंद्रावर मोठ्या प्रमाणात मतदारांच्या रांगाचं रांगा लागलेल्या होत्या. तर मतदार ताटकळत मतदान करणायसाठी उभे होते. घामाच्या धारा वाहत होत्या.अशीच व्यवस्था ही मतदार आणि पोलिसांची असल्याचे समोर आले. मतदानासाठी सकाळ पासूनच मतदारणी मोठा प्रतिसाद दिला



### मतदान केंद्रावर मतदाराच्या रांगा...मतदान मशीन केल्या स्लो

ठाण्यात लोकसभा मतदान पार पडत असताना मतदारांच्या भरघोस प्रतिसाद मिळाला. प्रत्येक केंद्रावर मतदारांच्या रांगा लागल्यानंतर प्रशासनाच्या अधिकारी यांनी मात्र मतदानाची मशीन ही स्लो केल्याने एका मतदाराला किमान पाच मिनटे लागत असल्याने मतदारांच्या उत्साहावर निवडणूक आयोगाच्या यंत्रनेने पाणी फेरल्याचे चित्र पाहायला मिळाले. ईव्हीम मशीन स्लो केल्याने मतदारांना घामाच्या धारा वाहत असतांनाही रांगेत ताटकळत राहावे लागल्याने मतदारणी संताप व्याकत केला. तर काही मतदार हे मतदान न करताच मतदान केंद्रावरून निघून गेल्याची सूत्रांची माहिती आहे. सत्ताधारी आणि प्रशासनाच्या अधिकारी यांच्या संगनमताने ईव्हीम मशीन स्लो केल्याचा आरोप राष्ट्रवादीचे जितेंद्र आव्हाड यांनी केला तर त्याला निवडणुकीचे उमेदवार माजी खासदार राजन विचारे यांनी ही विरोध दर्शविलेला आहे.

### २५ ठाणे लोकसभा मतदार संघात कुठे? काय घडले ?

- मतदान केंद्रावर गेलेल्या मतदारांची निराशा झाली. त्यांचे मतदान हक्क हे बोगस मतदारानी हायजेक केल्याने ज्येष्ठ नागरिक असलेल्या मतदारांच्या हालअपेष्टा झाल्या काहीतर ज्येष्ठ नागरिक सुविधेच्या अभावाने मतदान केंद्रावरून मतदान न करता निघून गेले.
- ठाण्यातील बहुतेक मतदान केंद्रावर सकाळी लवकर बोगस मतदान झालेले आहे.. मतदार राजा त्या ठिकाणी गेल्यानंतर त्याला कळतं की आपल्या नावाचं मतदान दुसऱ्यांनी केले
- आपला मतदानाचा हक्क वाया घालवू नका आपले मतदान करण्यासाठी निवडणूक आयोगाने १७ नंबर चा फॉर्म भरून पोस्टल बॅलेट द्वारे टेंडर वोट करून घेण्याची सुविधा दिल्याचे विचारेंचे आवाहन
- काही काळ बारा बंगला इथे देखील ईव्हीम मशीन बंद होती,
- लोकमान्य पाडा नं ४ ... या ठिकाणची मशीन अजून बंद आहेत, मतदार वाट बघत होते.
- लोकमान्य नगर पाडा नं ४ मध्ये राजा शिवाजी विद्यालय येथील मशीन गेले १ तासापासून बंद होती.
- ठाण्याच्या महाराष्ट्र विद्यालय आणि सेंट जॉन शाळा येथे बोगस मतदानाचे आरोप...ज्येष्ठ नागरिक दाम्पत्याच्या उत्साहावर पाणी फेरले.
- जिथे मतदारांच्या रांगा त्या ठिकाणी मतदान प्रक्रिया स्लो केल्याचा आरोप
- एका मतसाठी पाच मिनटाचा कालावधी जाणीवपूर्वक, सत्ताधारी आणि अधिकार्यांची हातमिळवणी –उमेदवारांचा आरोप
- मराठी टक्क्याच्या मात्डांनाच्यावेळी जाणीवपूर्वक मशीन स्लो केल्या
- मुंब्र्यात सहा ठिकाणी मतदारांच्या रंगाचं रांगा ....वाटली मतदानासाठी कुपण
- मुंबर्यात एटीएम मध्ये पैशाचे वाटप...शरद पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांचा आरोप ..नोंदविला आक्षेप
- घोडबंदर, येउर, लोकमान्य, सावरकर नगर मधील एकाच कुटुंबियांची नावे वेगवेगळ्या मतदान केंद्रावर...मतदारांची धावपळ
- नौपड्यातील अनेक मतदारांची नवे यादीतून झाली गायब

# पाचव्या टप्प्यात ठाण्यात ठिकठिकाणी गोंधळ

## ठाण्यातील नौपाडा येथे ईव्हीएम बंद! पावणे आठपर्यंत मतदान ठप्प; अनेक मतदार मतदान न करताच परतले माघारी

ठाणे – लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील मतदानाला सकाळी ७ पासून सुरुवात झाली आहे. मात्र, मतदान सुरू होण्यापूर्वी काही केंद्रांवर ईव्हीएममध्ये बिघाड झाल्याचे वृत्त आहे. ठाण्यातील नौपाडा येथील एका मतदान केंद्रवार दोन ईव्हीएम मशीन हे बंद पडले होते. यामुळे तब्बल ४५ मिनिटे ते तास भर हे मशीन बंद होते. यामुळे या ठिकाणी सकाळी ७ वाजता मतदान होऊ शकले नाही. सकाळी ७ पूर्वीच या मतदान केंद्रावर अनेक मतदारांनी रांगा लावल्या होत्या. मात्र, ईव्हीएम मशीन बंद असल्याने येथील मतदान खोळंबले होते. वाट बघूनही बराच वेळ मतदान सुरू न झाल्याने काही मतदार मतदान न करताच माघारी गेले. या बाबत या मतदार संघातील लोकसभेचे महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांनी निवडणूक आयोगाच्या कामावर नाराजी व्यक्त करत या बाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करणार असल्याचे सांगितले.

## बोगस मतदान, मशीन स्लो केल्यात, जिंतेंद्र आव्हाडांचा सर्वात मोठा आरोप



मुंबई–ठाण्यात आज बहुतांश ठिकाणी नागरिकांमध्ये मतदानाचा मोठा उत्साह आहे. पण मतदानाच्या प्रक्रियेला बराच वेळ लागतोय. त्यामुळे मतदानासाठी गेलेले नागरिक तक्रारी करत आहेत. काही मिनिटांच्या मतदानासाठी काही तास लागतायत. काही मतदान केंद्रावर गोंधळ सुरु असल्याच्या घटना समोर आल्या आहेत. मुंब्र्यात मतदानासाठी मतदान केंद्रावर रांगा लागल्या आहेत. मुंब्र्यात नागरिकांमध्ये मतदानाचा मोठा उत्साह आहे. पण मतदान प्रक्रियेला वेळ लागत असल्याने नागरिक चिडले आहेत. मुंब्र्यात पोलीस ठाण्याजवळील बाबाजी सखाराम पाटील शाळेत मतदानासाठी गर्दी झाली आहे. एका महिला मतदाराने या ठिकाणी नाराजी व्यक्त केलीय. मतदान स्लो, स्लो होतय. तीन–चार तास झालेत. जो पर्यंत मतदान करायला मिळणार नाही, तो पर्यंत इथून जाणार नाही. रात्री ११ वाजून गेले तरी चालतील, मतदान करुनच जाईन अस मतदानासाठी आलेल्या महिलेने ठणकावून सांगितलं. हे सर्व मुद्दामून सुरु आहे असं एक अन्य मतदार म्हणाला. मी निवडणूक निरीक्षक मनोज जैनशी बोललो. काही अधिकारी मुद्दामून करतायत. खुसपट काढतायतय. हे इथेच नाही, कळव्यात सुद्धा चालू आहे. लोकांना परत पाठवल जातय असं आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले. 'अधिकारी गप्पा मारतायत, हसतायत, खेळतायत', जितेंद्र आव्हाडांचा आरोप सहावाजता जो मतदार मतदानासाठी रांगेत उभा राहिलं, त्याला कितीही उशीर लागला, (पान २ वर)

# कल्याणमध्ये ८० हजाराहून अधिक तर भिवंडीत लाखाहून अधिक नावे गायब, निवडणूक आयोगाचा सावळा गोंधळ समोर

ठाणे : निवडणूक आणि मतदार याद्यांचा घोळ हे समीकरण गेल्या अनेक निवडणुकांपासून सुरू आहे, ते या निवडणुकीतही पाहायला मिळालं. भिवंडी लोकसभा मतदारसंघात कल्याण पश्चिम मध्ये हजारो नागरिकांची नावे मतदार यादीतून अचानक गायब झाली आहेत. एकूण आकडेवारी पाहता कल्याण लोकसभेमध्ये ८० हजारांहून जास्त तर भिवंडी लोकसभेसाठी एक लाखांहून जास्त मतदारांची नावं गायब झाल्याचं दिसतंय.

आज सकाळी लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होण्यासाठी नागरिक मोठ्या उत्साहात मतदान केंद्रात पोहोचले होते. त्यांचे वोटिंग कार्ड त्यांच्याजवल होते, पण मतदार यादी तपासली असता त्यांचं नावच मतदार यादीत नव्हतं. अनेकदा त्या मतदार याद्या त्यांनी डोळ्याखालून घातल्या. मात्र नाव न दिसून आल्याने या नागरिकांनी आपली नाराजी व्यक्त केली. कल्याण पश्चिमेकडील मुंबई विद्यापीठाच्या उपकेंद्रात असलेल्या मतदान केंद्रात या नागरिकांनी जोरदार घोषणाबाजी करत निवडणूक आयोगाचे अक्षरशः वाभाडे काढले.

नागरिकांनी निवडणूक आयोगाच्या या कारभाराविरोधात नाराजी व्यक्त केली आहे. हीच लोकशाही आहे का असा सवाल त्यांनी विचारला. मतदान करा असं आवाहन करता आणि मतदान यादीतून नाव काढता असा आरोप देखील यावेळी संतापलेल्या नागरिकांनी निवडणूक आयोगावर केला. शिंदे गटाचे कल्याण शहर प्रमुख रवी पाटील म्हणाले की, कल्याण भिवंडी लोकसभेत लाखो नागरिकांची नावे कमी केली आहे. जवळपास १ लाख नावे मतदार यादीतून वगळली आहेत. मतदार राजा बोलत आहे आमचा मतदानाचा अधिकार हिराहून घेतला आहे. निवडणूक आयोगाने यावर कारवाई करावी. काही दिवसांनी पुन्हा निवडणुका येणार आहेत. या यादीमध्ये डीलिटेड म्हणून शिक्के मारुन दिले आहेत. अनेक नावांमध्ये बदल झाले आहेत.

### निवडणुकीवर मोठा परिणाम होणार

मतदार यादीमधून लाखो नागरिकांची नावे वगळली गेली असल्याने कल्याण लोकसभेच्या निवडणुकीच्या रिंगणात उभे असलेल्या शिवसेना शिंदे गटाचे डॉ. श्रीकांत शिंदे आणि ठाकरे गटाच्या वैशाली दरेकर यांच्या मतदानावर परिणाम होऊ शकतो. तर भिवंडीमध्ये महायुतीचे उमेदवार कपिल पाटील आणि महाविकास आघाडीचे उमेदवार सुरेश म्हात्रे यांची मतदानावर मोठा परिणाम होऊ शकतो. मतदारयादीमधून नावे वगळण्यात असल्याने अनेकांनी निवडणूक निर्णायक अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. पण निवडणुकीमुळे आचारसंहिता लागू आहे, त्यामुळे यावर बोलता येत नसल्याची प्रतिक्रिया अधिकाऱ्यांनी दिली.

### निवडणूक याद्या अपडेट होत असल्याने अडचणी

निवडणूक याद्या या फिल्टर केलेल्या आहेत. बरीच नावं दुबार होती. या याद्या अपग्रेड होत आहेत. या याद्या अपग्रेड होतात फोटो येत आहेत त्यामुळे काही नावं वगळली जात आहेत.त्यामुळे त्याचा कोणी गैर अर्थ घेऊ नये असंही निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितलं.

# संपादकीय...




संपादक–चंद्रकांत भोईटे

## उद्धव ठाकरेंचे आरोप

राजकारणात नेहमी आरोप प्रत्यारोप होत असतात. नुकतेच मुंबईतील मतदान पार पडले. मुंबईत काही ठिकाणी जाणीवपूर्वक संथ गतीने मतदान सुरु असून निवडणूक आयोग भाजपाची चाकरी करत आहेत, असा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला होता. त्यावर प्रत्यारोप करताना भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे की, नेहमीप्रमाणे उद्धव ठाकरेंचे रडगाणे सुरु झाले आहे. ४ जूननंतर त्यांना खरी परिस्थिती समजेल. संथ गतीने मतदान होण्याच्या आरोपाला फडणवीसांनी प्रत्युत्तर दिले आहे. खरे तर देवेंद्र फडणवीस यांच्यावर उद्धव ठाकरे यांचा राग दिसत आहे. याचे कारण म्हणजे फडणवीस यांच्या सहकार्याने शिवसेनेमध्ये फूट पडली. उद्धव ठाकरे फडणवीस यांना यासाठी जबाबदार मानतात. त्यामुळे फडणवीस यांनी टीका केली तर उद्धव ठाकरे त्याला उत्तर देतात. राजकारणात ही जुगलबंदी उद्धव ठाकरे यांचा पक्ष फुटल्यानंतर जोरदारपणे सुरू राहिली आहे. त्यामुळे त्याचे पडसाद अनेक वेळा आरोप प्रत्यारोपमध्ये उमटतात.मुंबईत ज्या ठिकाणी शिवसेनेची मते आहेत, त्या ठिकाणी जाणीवपूर्वक संथ गतीने मतदान सुरु असून निवडणूक आयोग भाजपाची चाकरी करत आहेत, असा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला होता. या आरोपाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे. पराभव दिसू लागल्याने उद्धव ठाकरेंनी नेहमीप्रमाणे रडगाणे सुरू केले आहे, असे ते म्हणाले. एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली आहे. या पोस्टमध्ये फडणवीस म्हणतात की, मुंबईत संथ गतीने मतदान होत असल्याची तक्रार सर्वप्रथम आम्हीच आयोगाकडे केली होती. आता मात्र, नेहमीप्रमाणे उद्धव ठाकरे यांनी त्यांचे रडगाणे सुरु केले आहे. पराभव समोर स्पष्ट दिसत असताना त्यांनी सवयीप्रमाणे मोदीजींवर आरोप करणे सुरू केले आहे. ४ जूननंतरच्या स्थितीला सामोरे जाण्याची पार्श्वभूमी ते आताच तयार करत आहेत. शिवाय निवडणूक प्रक्रियेतील अधिकाऱ्यांना धमक्याही दिल्या जात आहेत, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली. पुढे बोलताना, माझी तमाम मुंबईकरांना विनंती आहे की, मतदान केंद्रावर जा आणि मोठ्या संख्येने मतदान करा. ६ वाजले तरी जितके लोक आतमध्ये असतील, त्या प्रत्येकाला मतदान करता येते. त्यामुळे मतदानाचा आपला हक्क बजावल्याशिवाय राहू नका, असे आवाहनही त्यांनी केले. मुंबईत संथगतीने मतदान सुरु असल्याच्या तक्रारींनंतर उद्धव ठाकरे यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेत निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर टीका केली होती. तसेच त्यांनी भाजपालाही लक्ष्य केले होते. पत्रकार परिषद घेऊन उद्धव ठाकरे यांनी भाजपवर निशाणा साधला आहे. त्यांनी म्हटले आहे की, आज महाराष्ट्रातील मतदानाचा शेवटचा टप्पा आहे. त्यासाठी शेवटचे काही तास बाकी आहेत. यावेळी मतदारांमध्येही उत्साह आहे. त्यामुळे मतदान केंद्रांवर मतदारांची खूप गर्दी आहे. मात्र, ज्या मतदान केंद्रावर शिवसेनेची मते आहेत, तिथे मतदान प्रक्रिया संथगतीने सुरू आहे. पराभवाच्या भीतीने जाणीवपूर्वक हा प्रकार सुरू आहे. निवडणूक आयोग पक्षपातीपणा करत असून ते केवळ भाजपाच्या इशाऱ्यावर काम करते आहे, असे ते म्हणाले होते. गेल्या पाच वर्षांत भारतात जे काही सुरू आहे, त्यावर विरोधी पक्ष केंद्र सरकारवर नाराज असल्याचे दिसून येते. या नाराजीतून उद्धव ठाकरे यांनी भाजपवर टीका केली असण्याची शक्यता वाटते. कारण विरोधकांवर ईडी व राष्ट्रीय तपास यंत्रणांचा दबाव टाकत त्यांना आपल्या पक्षांमध्ये सामील करून घेत भाजपाने वेगळी रणनीती खेळली असल्याचा संशय उद्धव ठाकरे यांना आहे. तसा तो सर्व विरोधकांनाही आहे. त्यामुळे विरोधी पक्ष सातत्याने केंद्र सरकारवर व भाजपावर टीका करत असल्याचे दिसतात. त्यावर भाजपचे नेते त्यांना उत्तर देत विरोधी पक्ष कसा कांगावा करतात हे आवर्जून सांगतात. परंतु भाजपाने महाराष्ट्रातील दोन प्रादेशिक पक्ष फोडले हेही कुणी विसरू शकणार नाही. कारण राज्यातील प्रादेशिक पक्ष फुटल्यानंतर मूळ पक्षांची अवस्था दयनीय झाली आहे. प्रादेशिक पक्षांची अवस्था कमकुवत करणे हे भाजपचे ध्येय राहिले आहे. त्यामुळे विरोधकांना असे वाटते की, भाजपा काहीतरी कटकारस्थान करीत आहे. या भावनेतून उद्धव ठाकरे यांनी निवडणुकीच्या दिवशी आपली शंका निवडणूक आयोगासमोर व्यक्त केली आहे असे दिसते.

सद्यस्थितीत जे हिन राजकारण चालले आहे, त्यामुळे केंद्र सरकारवर विरोधकांचा विश्वास राहिलेला नाही. तसेच तो जनतेचाही राहिलेला नाही. कारण ईडी व राष्ट्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर करत केंद्र सरकारने अनेक विरोधकांना गप्प बसवले आहे. तसेच काही जणांना आपल्या पक्षात घेऊन व काही प्रादेशिक पक्षांमध्ये फूट पाडून भाजपाने ते प्रादेशिक पक्ष कसे कमकुवत होतील हे पाहिले आहे. नुकताच झालेला निवडणूक रोखे व्यवहार संशयाच्या भोवऱ्यात आहे. कारण काही कार्पोरेट कंपन्यांना भीती दाखवत केंद्र सरकारने या कंपन्यांकडून निवडणूक निधी उकळला असल्याचे दिसून आले. परंतु यावर सर्वोच्च न्यायालयाने वा निवडणूक आयोगाने कोणतीही कारवाई केली नसल्याचा राग विरोधकांच्या मनामध्ये आहे. केंद्र सरकारच्या वर्तणुकीमुळे विरोधकांचा सरकारी यंत्रणावर विश्वास राहिलेला नाही. कारण दरवेळी सरकारी यंत्रणा केंद्र सरकारच्या बाजूने उभे राहतात असे दिसून आले आहे. त्यामुळेच उद्धव ठाकरे यांनी निवडणुकीच्या दिवशी काही गैरव्यवहार तर होत नाही ना, याकडे निवडणूक आयोगाचे लक्ष वेधले आहे. ही झाली उद्धव ठाकरे यांची बाजू ! परंतु लोकांमध्येही अशा प्रकारची कुजबूज सुरू आहे. सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला वेळोवेळी राष्ट्रीय तपास यंत्रणांच्या गैरवापरासंबंधी ताकीद दिली आहे. केंद्र सरकारने जर प्रथमपासून पारदर्शक व्यवहार ठेवला असता तर देशातील कोणताही विरोधी नेता केंद्र सरकारवर बोलला नसता. परंतु वेळच अशी आली आहे की, विरोधकांना केंद्र सरकार विचारात घेत नाही. तसेच राष्ट्रीय तपास यंत्रणांची जी कारवाई होते ती निव्वळ विरोधकांवर का होते अशीही चर्चा सुरू आहे. त्यामुळे या सर्वांचा परिपाक म्हणून उद्धव ठाकरेंनी निवडणूक आयोगाच्या वर्तनावर संशय घेतला यात काही विशेष वाटत नाही. परंतु या प्रकरणाला आरोप – प्रत्यारोपाचे स्वरूप देऊन भाजप नेते नेहमीच आपले हात झटकत असल्याचे दिसतात. तसेच ते विरोधकांवर टीका करण्यात पटाईत आहेत, हेच या प्रकरणातील सत्य आहे असे म्हणता येईल.

# ११ वी, १२ वीच्या परीक्षा पद्धतीत मोठा बदल



**केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (CBSE) इयत्ता ११ वी व १२ वी च्या परीक्षेच्या पद्धतीमध्ये काही महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. CBSE परीक्षा पॅटर्नचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सर्वांगीण विकास आणि सर्जनशील विचारांना प्रोत्साहन देणे असं आहे. येत्या काळात हे नवे बदल परीक्षेत अवलंबले जातील. हे बदल नेमके काय आहेत व त्याचा नेमका कसा फायदा होऊ शकतो हे आज आपण जाणून घेणार आहोत. मानव रचना शैक्षणिक संस्थांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व प्राध्यापिका गौरी भसीन यांनी इंडियन एक्सप्रेससाठी लिहिलेल्या लेखात याविषयी तपशीलवार माहिती दिली आहे.**

## प्रश्न व गुणांची टक्केवारी कशी बदलणार? CBSE समोर आव्हान काय?

### सीबीएसई परीक्षेत काय बदलणार?

एक महत्त्वाचा बदल म्हणजे बोर्ड परीक्षेच्या निकालाची टक्केवारी १०० वरून कमी करून ८० अशी करण्यात आली आहे. २० टक्के महत्त्व हे प्रकल्प, तोंडी परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा अशा पद्धतीने विभागले जातील. असा बदल करण्याचे मुख्य कारण म्हणजे फक्त पुस्तकी ज्ञान देण्यापेक्षा, शिकलेल्या गोष्टींचा उपयोग कसा करावा याचे प्रशिक्षण देण्यावर भर दिला जावा असा बोर्डाचा हेतू आहे. २१ व्या शतकातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी प्रत्येक विद्यार्थी सज्ज असेल याचा बंदोबस्त करण्याच्या हेतूने या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. बहुपर्यायी प्रश्न (MCQ), केस–स्टडी आणि स्त्रोत–आधारित प्रश्नांच्या स्वरूपातील प्रश्न हे ५० टक्के गुण देणारे असतील. तर थोडक्यात आणि दीर्घ दोन्ही उत्तरांचा समावेश असलेल्या प्रश्नांची टक्केवारी ३० टक्क्यांपर्यंत असेल. यापूर्वी हे प्रमाण दोन्ही बाबतील ४० टक्के होते.

### सीबीएसईचा नवीन परीक्षा पॅटर्नचे अपेक्षित परिणाम

- सीबीएसई परीक्षा पद्धतीत लागू केलेल्या बदलांचा विद्यार्थ्यांवर लक्षणीय परिणाम होऊ शकतो. याचा महत्त्वाचा फायदा म्हणजे विद्यार्थ्यांना खऱ्या आयुष्यात रोज येणाऱ्या प्रश्नांना कसे सोडवावे याचे मार्गदर्शन केले जाईल. विषयाचा सखोल अभ्यास वाढेल
- प्रकल्प व प्रात्यक्षिकांचे प्रमाण वाढल्याने विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलतेला वाव मिळेल.
- ॲप्लिकेशन–ओरिएंटेड प्रश्नांमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रवासाच्या पुढील टप्प्यासाठी म्हणजेच नोकरीसाठी आवश्यक असलेला पाया प्राप्त होईल.
- नवीन मूल्यांकन पद्धतींशी जुळवून घेणे आणि प्लिकेशन–ओरिएंटेड मानसिकता निर्माण करणे हे पारंपरिक अभ्यासाच्या पद्धतीपेक्षा वेगळे असू शकते.

### सीबीएसई चा नवीन परीक्षा पॅटर्न: फायदे आणि आव्हाने

मूल्यांकन पद्धतीतील बदलांचे फायदे आहेत हे खरं असलं तरी यामध्ये अनेक आव्हाने सुद्धा आहेत. मुख्य समस्या म्हणजे अंमलबजावणी कधी करायची. शाळांमधील अंतर्गत मूल्यांकनांमध्ये एकसमानता, पारदर्शकता याची खात्री करून घेणे गरजेचे असेल. तसेच प्रकल्पात गुणवत्ता तपासताना विद्यार्थ्यांची वैचारिक समज, सर्जनशीलता समजून घेणं सुद्धा आवश्यक असेल. यासाठी सर्वात आधी शिक्षकांचं प्रशिक्षण आवश्यक असेल. तसेच अंमलबजावणी सुरु झाल्यावर सुद्धा नियमित फीडबॅक घेतल्याने आणि सतत देखरेख केल्याने या बदलांचा योग्य अवलंब करता येईल.



९२ वर्षांच्या श्रीमती सुधा वाड यांनीही आपल्या मतदानाचा हक्क आज बजावला



ठाणे लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या उमेदवार यांचे भविष्य मतपेटीत सील करताना अधिकारी (छाया – मनोज सिंह)





ठाण्यात चंदनवाडी येथे स्वामी प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश कदम यांच्यावतीने एक बॅनर लावण्यात आले आहे. **'झाले इलेक्शन जपा रिलेशन'** या बॅनर ने नागरिकांचे लक्ष केंद्रित केले आहे. (छाया : मनोज सिंह)

## २४ कल्याण लोकसभा मतदारसंघात सायंकाळी ५.०० अंदाजे ४१.७० टक्के मतदान

ठाणे, दि. २० (जिमाका) : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील मतदानाला ठाणे जिल्ह्यातील २४ कल्याण लोकसभा मतदारसंघात आज दि. २० मे २०२४ रोजी सकाळी ७.००वा. पासून सुरुवात झाली. २४ कल्याण मतदारसंघातील एकूण ६ विधानसभा मतदारसंघात सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अंदाजे सरासरी ४१.७० टक्के मतदान झाले आहे.

ठाणे जिल्ह्यातील २४ कल्याण मतदारसंघातील विधानसभा मतदारसंघनिहाय टक्केवारी पुढीलप्रमाणे

१४० अंबरनाथ – ४०.०१ टक्के
१४१ उल्हासनगर – ४२.६८ टक्के
१४२ कल्याण पूर्व – ४२.५८ टक्के
१४३ डोंबिवली – ४२.५१ टक्के
१४४ कल्याण ग्रामीण – ४२.७३ टक्के
१४९ मुंब्रा कळवा – ४०.३५ टक्के

ही आकडेवारी अंदाजे असून अंतिम आकडेवारी मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मिळणार आहे.

## २५ ठाणे लोकसभा मतदारसंघात सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अंदाजे ४५.३८ टक्के मतदान

ठाणे – लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील मतदानाला ठाणे जिल्ह्यातील २५ ठाणे लोकसभा मतदारसंघात आज दि. २० मे २०२४ रोजी सकाळी ७.०० वाजल्यापासून सुरुवात झाली. २५ ठाणे मतदारसंघातील एकूण ६ विधानसभा मतदारसंघात सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सरासरी अंदाजे ४५.३८ टक्के मतदान झाले आहे.

ठाणे जिल्ह्यातील २५ ठाणे मतदारसंघातील विधानसभा मतदारसंघनिहाय अंदाजे टक्केवारी पुढीलप्रमाणे---

१४५ मिरा भाईंदर – ४३.२५ टक्के
१४६ ओवळा माजिवडा – ४४.२९टक्के
१४७ कोपरी पाचपाखडी – ५१.०७ टक्के
१४८ ठाणे – ४५.९९ टक्के
१५० ऐरोली –४२.६६ टक्के
१५१ बेलापूर – ४७.१२ टक्के

ही आकडेवारी अंदाजे असून अंतिम आकडेवारी मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मिळणार आहे.

## २३ भिवंडी लोकसभा मतदारसंघात सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अंदाजे ४८.८९ टक्के मतदान

ठाणे – लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील मतदानाला ठाणे जिल्ह्यातील २३ भिवंडी लोकसभा मतदारसंघात आज दि. २० मे २०२४ रोजी सकाळी ७.०० वाजल्यापासून सुरुवात झाली. २३ भिवंडी मतदारसंघातील एकूण ६ विधानसभा मतदारसंघात सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अंदाजे सरासरी ४८.८९ टक्के मतदान झाले आहे.

ठाणे जिल्ह्यातील २३ भिवंडी मतदारसंघातील विधानसभा मतदारसंघनिहाय टक्केवारी पुढीलप्रमाणे

१३४ भिवंडी ग्रामीण – ५८.०० टक्के
१३५ शहापूर – ५०.९९ टक्के
१३६ भिवंडी पश्चिम – ४७.८० टक्के
१३७ भिवंडी पूर्व – ४३.३७ टक्के
१३८ कल्याण पश्चिम –४३.०० टक्के
१३९ मुरबाड – ५१.१८ टक्के

ही आकडेवारी अंदाजे असून अंतिम आकडेवारी मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मिळणार आहे.

## धाकधूक वाढली...उद्या १ वाजता लागणार बारावीचा निकाल!

**(पान १ वरून)** उच्च शिक्षणासाठी कोणती शाखा निवडायची, याबद्दल विद्यार्थी आणि पालकांची दिशा निश्चित होत असते. त्यामुळे बारावीची परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्वाचा टप्पा मानला जातो. परिणामी बारावीच्या परीक्षेला विशेष महत्त्व असते. त्यामुळे आता उद्या जाहीर होणाऱ्या बारावीच्या परीक्षेच्या निकालात काय समोर येणार, याची उत्सुकता अनेकांना लागून राहिली आहे.

## बोगस मतदान, मशीन स्लो केल्यात, जितेंद्र आव्हाडांचा सर्वात मोठा आरोप

**(पान १ वरून)** रात्रीचे ११ वाजू दे तरी तो मतदान करणारच. मी या बद्दल लवकरच एक व्हिडिओ पोस्ट करीन असं जितेंद्र आव्हाड म्हणाले. कायदा आहे, तेच कायदा सांगतो. जेढा वेळ वाया जाईल, तेवढा मतदानाला द्यावाच लागेल. सहा वाजता जेवढी लोक इथे असतील तेवढ्या लोकांकडून मतदान करुन घ्यावच लागेल असं जितेंद्र आव्हाड म्हणाले. 'अधिकारी मुद्दामून हे करतायत, गप्पा मारतायत, हसतायत, खेळतायत' असा आरोप जितेंद्र आव्हाड यांनी केला.

## पाचव्या टप्प्यात मुंबईत ठिकठिकाणी गोंधळ

**मुंबई – लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील १३ जागांसाठी महाराष्ट्रात आज मतदान पार पडतंय. यामध्ये मुंबईतील ६ लोकसभा मतदारसंघाचा समावेश आहे. सकाळी ७ वाजेपासून मतदानाला सुरुवात झाली आहे. ठिकठिकाणी मतदान केंद्राबाहेर नागरिकांनी लांबच लांब रांगा लावल्या आहेत. अशातच ईशान्य मुंबईतून एक मोठी अपडेट समोर आली आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या दोन कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.**

मतदान केंद्राबाहेर उमेदवारांच्या नावाची चिठ्ठी घेऊन बसल्यामुळे कांजूर मार्ग पोलिसांनी ठाकरे गटाच्या दोन कार्यकर्त्यांना ताब्यात घेतल्याची माहिती आहे. दोन्ही कार्यकर्त्यांना घेऊन पोलीस निघून गेले आहेत. या प्रकारामुळे शिवसैनिक आक्रमक झाले आहेत. पोलिसांकडून दडपशाही सुरू असल्याचा आरोप ठाकरे गटाच्या नेत्यांनी केला आहे.

कार्यकर्त्यांना नेमक्या कोणत्या कलमाखाली ताब्यात घेतलं, त्यांची चूक काय होती. ते मतदान केंद्राच्या १०० मीटर बाहेर होते, असा जाब शिवसेना खासदार संजय राऊत यांनी विचारला आहे. दुसरीकडे ताब्यात घेतलेल्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी १० मिनिटाच्या आत सोडून द्यावं, अन्यथा पोलीस ठाण्याबाहेर मोठं आंदोलन करू, असा इशारा ठाकरे गटाचे नेते सुनील राऊत यांनी दिला आहे.

सुनील राऊत म्हणाले, सध्या पोलीस दोन्ही कार्यकर्त्यांना पोलीस ठाण्यात घेऊन गेले आहेत. निवडणूक कार्यालयात जाऊन ते नियम समजून घेणार आहेत. जर कार्यकर्ते निवडणूक केंद्राच्या १०० मीटरच्या बाहेर असेल, तर आम्ही त्यांना सोडून देऊ, असं पोलिसांनी आम्हाला सांगितलं आहे.

पोलीस यंत्रणा भाजपच्या दबावाखाली आहे. ते भाजपचे गुलाम म्हणून काम करीत आहेत. पण मी पोलिसांना सांगतो, की ४ जून रोजी सरकार बदलणार आहेत. त्यावेळी तुम्ही काय करणार? आमच्या कार्यकर्त्यांना तत्काळ सोडून द्यावं, अन्यथा आंदोलन करू, असा इशाराही सुनील राऊत यांनी दिला आहे.

## मोदींच्या डावाला बळी पडू नका; मतदान कराच, पहाटे ५ वाजले तरी..; उद्धव ठाकरेंचा आरोप

मुंबई: लोकसभा निवडणुकीचा पाचवा टप्पा महाराष्ट्रात पार पडत आहे. आज मुंबईसह उनगरांत मतदान प्रक्रिया राबववली जात आहे. असं असताना मात्र, मतदारांकडून अनेक तक्रारी समोर येत आहेत. मतदान अगदी संथगतीने सुरू आहे. यावर अनेक नेत्यांनी आक्षेप नोंदवला आहे. आता यावर, ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. शिवसेना भवन येथे पत्रकार परिषद घेत त्यांनी मोदी सरकारवर निशाणा साधला आहे.

काही विशिष्ट वस्त्यांमध्ये मतदान मुद्दामहून उशिराने केलं जात आहे. निवडणूक आयोग हे पंतप्रधान मोदींच्या घरगड्यासारखे काम करत आहेत. पराभवाच्या भीतीने हे सगळं सुरू आहे. तरीसुद्धा मी मतदारांना आवाहन करतो की, तुम्ही मोदींच्या या डावाला बळी पडू नका. सकाळी ५ वाजले तरी चालतील, तुम्ही तुमचा मतदानाचा हक्क बजावा, असं ठाकरेंनी पत्रकार परिषद घेत म्हटलं आहे.



### मतदारांमध्ये उत्साह पण

मतदारंमध्ये मोठा उत्साह आहे पण, निवडणूक आयोग हा भाजपाचा घरगडी असल्याप्रमाणे काम करत असून पक्षपातीपणा करत असल्याचा आरोप उद्धव ठाकरेंनी केला आहे. ते म्हणाले की, मतदान केंद्रावर जाणूनबुजून अधिकाऱ्यांकडून वेळकाढूपणा केला जात आहे. मतदारांनी मतदानाला उतरू नये, त्यांनी बाहेरच्या रांगा पाहून कंटाळून परत जावं यासाठी सरकारचा डाव आहे. ज्या ठिकाणी तुम्हाला मतदानाला जाणून बुजून वेळकाढूपणा केला जात आहे. त्यावेळी तुम्ही जवळच्या शिवसेना शाखेला त्याची माहिती द्या.

### पराभवाच्या भीतीने मोदी पछाडलेत

मतदानासाठी मोठ्या रांगा लागल्याचं दिसत असलं तरी मतदान करा. शेवटचा मतदार हा मतदान करत नाही तोपर्यंत निवडणूक आयोग मतदान थांबवून शकत नाही, त्यामुळे वेळेच्याआधी मतदारांनी केंद्रात जावं आणि मतदान करावं, असं उद्धव ठाकरे म्हणाले. मोदी सरकार पराभवाच्या भीतीने पछाडलेले आहेत, असा टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला. ते म्हणाले की, मतदानासाठी गेलेल्या अनेकांची नावं यादीमधून वगळली जाणं हा सरकारचा आवडता खेळ आहे. अनेक ठिकाणी बोगस मतदान झाल्याचंही समोर आलं आहे.

## पराभवामुळे विरोधकांकडून रडीचा डाव, मुख्यमंत्री शिंदेंची टीका

ठाणे : राज्यात आज १३ लोकसभेच्या जागांवर पाचव्या टप्प्यात मतदान होत आहे. तर मुंबईत सहा लोकसभा मतदारसंघात उत्साहात मतदान सुरू आहे. मुंबईतीस सहा लोकसभा, ठाणे, कल्याण, पालघर या लोकसभेत सकाळी ०९ वाजेपर्यंत सरासरी ६ ते ७ टक्के मतदान झाले आहे. पण मतदानाच्या दिवशीही विरोधक आणि सत्ताधारी यांच्यामध्ये आरोप–प्रत्यारोप होत असल्याचे पाहायला मिळत आहेत.

एकीकडे ठाण्यात बोगस मतदानाचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार राजन विचारे यांनी केल्यानंतर त्यांच्या या आरोपांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून प्रत्युत्तर देण्यात आले आहे. बोगस मतदार आणण्याची आम्हाला काहीही गरज नाही. कारण आज संपूर्ण मतदार महायुतीच्या प्रेमात आहेत, असे मुख्यमंत्र्यांकडून सांगण्यात आले.

मतदानाला जाण्यापूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या ठाण्यातील निवासस्थानातून प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना राजन विचारे यांनी केलेल्या बोगस मतदानाबाबत विचारण्यात आले. या आरोपांबद्दल ते म्हणाले की, नौपाडा परिसरातील एक ईव्हीएम एक तास बंद पडले होते. मी जिल्हाधिकाऱ्यांना फोन करून हे मशीन लवकरात लवकर सुरू करण्याच्या सूचना दिल्या आहेत. बोगस मतदार आणण्याची आम्हाला काहीही आवश्यकता नाही? कारण आज संपूर्ण मतदार महायुतीच्या प्रेमात आहे. आम्ही ठाण्यात काम केले आहे. ठाणे हा शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघेंचा हा बालेकिल्ला आहे. तसेच, या ठाण्यासाठी मी मागील अनेक वर्ष काम केले आहे. त्यामुळे इथे मतदार स्वेच्छेने मतदान करतोय आणि सर्वजण मतदान करण्यासाठी २० तारखेची वाट पाहत होते. ज्यांनी आरोप केला आहे, त्यांनी हत्यारे टाकली आहेत. पराभवाची चाहूल त्यांना लागली आहे. त्यामुळे जेव्हा पराभव दिसतो, तेव्हा अशा प्रकारची वक्तव्य केली जातात. अशा पद्धतीचा रडीचा डाव खेळला जातो, अशा शब्दांमध्ये मुख्यमंत्री शिंदे यांनी राजन विचारेंवर निशाणा साधला.

## महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.

- पदाचे नाव : विद्युत सहाय्यक

शैक्षणिक पात्रता: (i) १०+२ बंधातील माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी) (ii) ITI (विजतंत्री/तारतंत्री (Electrician / Wireman) किंवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय परीक्षा मंडळ यांनी प्रमाणित केलेले ०२ वर्षांचा पदविका (Electrician / Wireman) अभ्यासक्रम प्रमाणपत्र.

- वयाची अट: २९ डिसेंबर २०२३ रोजी १८ ते २७ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
- फी : खुला प्रवर्ग: २५०/- मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ: १२५/-
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० जून २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.mahadiscom.in/

## इंडियन आर्मी डेंटल कॉर्प्स भरती

- पदाचे नाव: शार्ट सर्विस कमिशन ऑफिसर
- शैक्षणिक पात्रता: (i) ५५% गुणांसह BDS/MDS (ii) एक वर्षाची रोटेटरी इंटर्नशिप पूर्ण (iii) NEET (MDS)-२०२४
- वयाची अट: ३१ डिसेंबर २०२४ रोजी ४५ वर्षांपर्यंत.
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०५ जून २०२४
- अधिकृत वेबसाईट : https://www.indianarmy.nic.in/

## भारतीय हवाई दलात अग्निवीरवायु (संगीतकार) पदाची भरती

- कोर्सचे नाव: अग्निवीरवायु इनटेक ०१/२०२५

जागा : पद संख्या तूर्तास निर्दिष्ट नाही.

पदाचे नाव: अग्निवीरवायु (संगीतकार)

- शैक्षणिक पात्रता: (i) १०वी उत्तीर्ण (ii) संगीत अनुभव प्रमाणपत्र/डिप्लोमा
- शारीरिक पात्रता: उंची/छाती पुरुष महिला , उंची १६२ सेमी १५२ से.मी.

छाती ७७ से.मी./किमान ०५ सेमी फुगवून. -

वयाची अट: जन्म ०२ जानेवारी २००४ ते ०२ जुलै २००७ दरम्यान.

- वय गणकयंत्र: वय मोजा
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०५ जून २०२
- मेळाव्याचा कालावधी: ०३ ते १२ जुलै २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://indianairforce.nic.in/

## यूपीएससीमार्फत संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा २०२४

- परीक्षेचे नाव: संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा (CDS-II) २०२४
- पदाचे नाव/कोर्सचे नाव

१ भारतीय भूदल (मिलिटरी) अकॅडेमी, डेहराडून १५९

२ भारतीय नेव्हल अकॅडेमी, एझीमाला, Executive (General Service)/Hydro

३ हवाई दल अकॅडेमी, हैदराबाद,No. 218 F(P) Course

४ ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडेमी (पुरुष) चेन्नई, 122nd SSC (Men) Course (NT)

५ ऑफिसर्स ट्रेनिंग कॅडमी (महिला) चेन्नई,-36th SSC Women (Non-Technical) Course

- जागा : ४५९
- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: पदवीधर.

पद क्र.२: इंजिनिअरिंग पदवी.

पद क्र.३: पदवी (Physics and Mathematics at 10+2 level) किंवा इंजिनिअरिंग पदवी.

पद क्र.४: पदवीधर.

पद क्र.५: पदवीधर.

- वयाची अट:

पद क्र.१: जन्म ०२ जुलै २००१ ते ०१ जुलै २००६ दरम्यान.

पद क्र.२: जन्म ०२ जुलै २००१ ते ०१ जुलै २००६ दरम्यान.

पद क्र.३: जन्म ०२ जुलै २००१ ते ०१ जुलै २००५ दरम्यान.

पद क्र.४: जन्म ०२ जुलै २००० ते ०१ जुलै २००६ दरम्यान.

पद क्र.५: जन्म ०२ जुलै २००० ते ०१ जुलै २००६ दरम्यान.

- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत.
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०४ जून २०२४
- लेखी परीक्षा: ०१ सप्टेंबर २०२४
- अधिकृत वेबसाईट:

## आर्ममेंट रिसर्च डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट

- जागा : २०
- ज्युनियर रिसर्च फेलो
- रिसर्च असोसिएट
- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: प्रथम श्रेणी BE/B.Tech+NET/GATE किंवा प्रथम श्रेणी M.Sc+NET

पद क्र.२: (i) PhD (ii) ME/M.Tech (iii) ०३ वर्षे अनुभव

वयाची अट: २८ वर्षांपर्यंत SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: पुणे
- अर्ज पाठविण्याचा पत्ता: The Director, Armament Research Development Establishment (ARDE), Armament Post, Pashan, Pune- 411021
- अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३१ मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.drdo.gov.in/drdo/labs-and-establishments/armament-research-development-establishment-arde

## महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.

- पदाचे नाव : विद्युत सहाय्यक

शैक्षणिक पात्रता: (i) १०+२ बंधातील माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी) (ii) ITI (विजतंत्री/तारतंत्री (Electrician / Wireman) किंवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय परीक्षा मंडळ यांनी प्रमाणित केलेले ०२ वर्षांचा पदविका (Electrician / Wireman) अभ्यासक्रम प्रमाणपत्र.

- वयाची अट: २९ डिसेंबर २०२३ रोजी १८ ते २७ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
- फी : खुला प्रवर्ग: २५०/- मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ: १२५/-
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० जून २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.mahadiscom.in/

# कामोठेत रंगले कुस्तींच्या दंगलीचे अधिवेशन

**पनवेल : भव्य मैदान आणि त्यात आकर्षक रोषणाईसह लाल मातीचा दर्जेदार आखाडा, भव्य व्यासपीठ, शेकडो मान्यवरांची उपस्थिती, तिन्ही दिशेला हजारोंच्या संख्येने भरलेली भरगच्च प्रेक्षक गॅलरी, हलगीचा ठेका, दणदणीत सूत्रसंचालन, दक्ष पंच, कुस्तीचा जादूगार पैलवान देवा थापाची चपळाई अशा सर्व सूत्रांचे एकीकरण करत कामोठेत कुस्तींच्या दंगलीचे अधिवेशन रंगले! निमित्त होते ते पनवेल महानगर पालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसाचे.**



महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने कामोठ्यात 'मा.श्री. परेश ठाकूर केसरी २०२४' भव्य कुस्त्यांचे जंगी सामने रंगले. या आखाड्यात नेपाळमधील पैलवान देवा थापा आणि हिमाचल प्रदेशमधील पैलवान नवीन चौहान यांची बिग शो मॅच आकर्षण ठरली. यामध्ये देवा थापा याने नवीन चौहानला चीतपट करून बाजी मारली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून कुस्तीपटू या कुस्तीच्या दंगलीत सहभागी झाले होते. एकास एक सरस अशा कुस्त्यांनी वातावरणात जल्लोष पहायला मिळत होता. या स्पर्धेचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे सचिव हिंदकेसरी पैलवान योगेश दोडके यांच्या हस्ते झाले. या वेळी पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे तसेच भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, उपाध्यक्ष के. के. म्हात्रे, कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, खारघर अध्यक्ष प्रविण पाटील, कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, कुस्ती असोसिएशनचे अध्यक्ष बळीराम पाटील, भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी नगरसेवक हरेश केणी, मनोहर म्हात्रे, दिलीप पाटील, डॉ. अरुणकुमार भगत, विजय चिपळेकर, विकास घरत, एकनाथ गायकवाड, बबन मुकादम, तेजस कांडपिळे, अमर पाटील, गोपीनाथ भगत, राजेंद्र शर्मा, माजी नगरसेविका हेमलता गोवारी, शिला भगत, कुसूम म्हात्रे, अरुणा भगत, पुष्पा कुत्तरवडे, भाऊ भगत, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, युवा नेते हॅप्पी सिंग, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, विद्या तामखेडे, रुपेश पावशे, विनोद नाईक, हर्षवर्धन पाटील, तेजस जाधव, यांच्यासह इतर पदाधिकारी, तालुका कुस्तीगीर असोसिएशनचे सदस्य आणि मोठ्या संख्येने कुस्तीप्रेमी उपस्थित होते.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, कुस्तीगीर पैलवान नुसता ताकदवान असून चालत नाही, तर त्याच्याबरोबर अंगात चपळता असली पाहिजे. डावपेच टाकण्याची पद्धतही महत्त्वाची असते. यातून खऱ्या अर्थाने आपले जीवन घडवण्याचे काम कुस्तीगीरांमधून होत आहे. त्यांनी पुढे म्हटले की, काही वर्षांपूर्वी येथे मोठ मोठ्या कुस्त्यांचे सामने भरवले जात होते. कोरोनानंतर ते बंद झाले. परेश ठाकूर हे खेळामध्ये नेहमीच रस घेत असतात. त्यामुळे त्यांनी कुस्तीला प्रोत्साहन देण्यासाठी आपल्या वाढदिवसाच्या दिवशी कुस्तीचे सामने आयोजित करण्याचा निर्णय घेतला. यातून कुस्तीपटूंना अपेक्षेपेक्षा जास्त प्रोत्साहन मिळालेले दिसत आहे. हिंदकेसरी योगेश दोडके हे राज्य कुस्ती असोसिएशनचे सचिव आहेत. त्यांनी परेश ठाकूर यांची आज रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून निवड जाहीर केली आहे. त्यामुळे मला खात्री आहे की, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली परेश ठाकूर आपल्या जिल्ह्यात कुस्तीला चालना देतील. पनवेल तालुक्यात कुस्तीचा आखाडा होणे गरजेचे आहे. गव्हाण ग्रामपंचायतीत आम्ही सिडकोकडे २० हजार मीटरचा प्लॉट मागितला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवण्यात येणार आहे, त्याच्या बाजूला एक एकर जागा कुस्तीचा आखाडा बनवण्यासाठी घेण्याचा आमचा मानस आहे. सिडकोच्या परवानगीसाठी वेळ लागेल, पण मनामध्ये आलंय त्यामुळे ते पूर्ण केले जाईल, असे सांगून लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी परेश ठाकूर यांच्यावरील प्रेमामुळे उपस्थित राहिलेल्या सगळ्यांचे आभार मानून भावी काळात कुस्तीगीरांनी स्पर्धेत अधिक जोमाने भाग घ्यावा, असे आवाहन केले व परेश ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

आमदार निरंजन डावखरे यांनी परेश ठाकूर यांनी वाढदिवसानिमित्त मातीतील कुस्ती आयोजित केल्याबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन केले. ते म्हणाले, आपल्या मातीबरोबर जोडून ठेवण्यासाठी या पद्धतीचे खेळ आवश्यक आहेत. हल्ली आपण पाहतो की कबड्डी, कुस्ती मॅटवरच खेळ जास्त होतात. अशा वेळी मातीतील कुस्तीचा खऱ्या अर्थाने आनंद आपल्या इथे पहायला मिळत आहे. यातूनच परेशशेठ यांची नाळ येथील मातीशी जुळल्याचे दिसून येते.

नेपाळमधील पैलवान देवा थापा यांनी म्हटले की, परेश ठाकूर यांना जन्मदिनाच्या खूप खूप शुभेच्छा. मी अनेक ठिकाणी गेलो, पण पनवेकरांसारखे प्रेम मला कोठेच मिळाले नाही. मला आपण बोलवल्याबद्दल धन्यवाद!

गिरवले (ता. पनवेल) येथील पैलवान प्रतिक हातमोडे यांनी सांगितले की, या सामन्यांचे आयोजन चांगले आहे. विशेष म्हणजे बक्षिसाची रक्कमही चांगली आहे. कुस्तीत वन मॅन शो असतो. मनापासून आवड असेल तरच या खेळात येणे चांगले, कारण यामध्ये खाणे-पिणे व्यवस्थित लागते. पनवेल भागात आखाडा तयार झाला, तर निश्चितच त्याचा फायदा आमच्यासारख्या कुस्तीपटूंना होईल.



# तुम्ही जिवंत मासे गिळल्याने दमा बरा होऊ शकतो?

दमा किंवा अस्थमा हा एक श्वसनाचा आजार आहे. दमा या आजाराचे रुग्ण पाहिले नाहीत, असे सहसा होत नाही. वयाच्या प्रत्येक टप्प्यावरील व्यक्तीला याचा त्रास होताना दिसून येतो. आपल्या आजूबाजूला असलेली प्रचंड धूळ, माती व प्रदूषण या सर्वांमुळे श्वसनाशी संबंधित आजारांचे प्रमाण वाढत आहे. अनेक व्यक्तींचे आजार बळावत असून, त्यांना दमा झाल्याचे निदान होत आहे. दमा हा श्वसनमार्ग आणि फुफ्फुसांशी संबंधित एक गंभीर आजार आहे. त्यामध्ये अनेक वेळा रुग्णाला योग्य वेळी उपचार न मिळाल्यास त्याचा जीवही जाऊ शकतो. हा आजार लहानांपासून मोठ्यांपर्यंत कधीही होऊ शकतो.

सध्या भारतासह जगातील अनेक देशांमध्ये दम्याच्या रुग्णांची संख्या वाढत आहे. दमा ही एक श्वसन स्थिती आहे; जी तुमच्या फुप्फुसांवर परिणाम करते. या प्रकरणात ब्रोन्कियल नलिका सूजतात; ज्यामुळे स्नायूंमध्ये हवा जाणे कठीण होते आणि श्वास घेण्यात अडचण वाढते. अशा स्थितीत श्वास घेताना घरघरण्याचा आवाज येतो. त्यावर योग्य वेळी उपचार न केल्यास अस्थमा हा जीवघेणा ठरू शकतो. परंतु, दमा अतिशय गंभीर स्वरूपाचा हा आजार असला तरी काळजी घेतल्यावर आणि योग्य उपचार केल्यावर तो बरा होऊ शकतो. पण, जिवंत मासे गिळल्याने दमा बरा होऊ शकतो का? याच विषयावर बेंगळुरू येथील एमडी रेस्पिरेटरी मेडिसिन आणि 'बड्र्स क्लिनिक'चे वरिष्ठ सल्लागार डॉ. शिवकुमार के. यांनी माहिती दिल्याचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. त्यासंबंधी सविस्तर माहिती जाणून घेऊ.

दम्याचा आजार असणाऱ्यांसाठी वरदान ठरणाऱ्या हैदराबादच्या 'फिश प्रसादम' अर्थात दम्यावरील घरगुती तयार केलेल्या औषधाच्या वाटपाला ८ जूनपासून सुरुवात होणार आहे. जिवंत माशाच्या तोंडाला विशिष्ट पद्धतीने तयार करण्यात आलेले औषध लावण्यात येते आणि तो मासा रुग्णाच्या घशात सोडण्यात येतो. हे औषध दमाग्रस्तांना देण्यात येते.

बथिनी हरिनाथ गौड (जे गेल्या वर्षी निधन झाले) यांच्या अध्यक्षतेखालील गौड कुटुंबाने ही प्राचीन प्रथा सुरू केली. ही प्रथा दमा आणि श्वसनाच्या इतर आजारांपासून आराम मिळत असल्याचा दावा करते. 'मत्स्यप्रसाद' वाटण्याची ही परंपरा १७८ वर्षांपासून सुरू आहे. दरवर्षी 'मृगसिरा कार्थी'च्या दिवशी 'फिश प्रसादम'चे वाटप केले जाते. गौड कुटुंबाने पूर्वी इंडियन एक्स्प्रेसला सांगितले होते की, श्वासोच्छवासाच्या आजाराने त्रस्त असलेल्या व्यक्तीच्या घशात हर्बल पेस्ट टाकून जिवंत स्नेकहेड मुरल फिश दिल्याने कायमचा आराम मिळतो, असा दावा गौड कुटुंबाकडून करण्यात आला आहे.

त्यावर डॉ. शिवकुमार के. सांगतात, ''आज आपण पुराव्यावर आधारित औषधांच्या युगात आहोत. योग्य पुराव्याशिवाय अशा पद्धतींची शिफारस करणे किंवा लिहून देणे योग्य नाही. कोणत्याही दावा केलेल्या उपचारांची शिफारस करण्यापूर्वी, तसेच त्याची सुरक्षितता आणि परिणामकारकता स्थापित करण्यासाठी व्यापक प्रयोगशाळा अभ्यास आणि क्लिनिकल चाचण्या केल्या पाहिजेत.''

डॉ. शिवकुमार यांच्या मते, अस्थमाच्या लक्षणांवर उपचार करण्यासाठी किंवा तो कमी करण्यासाठी 'फिश प्रसादम'च्या परिणामकारकतेचे समर्थन करणारे कोणतेही वैज्ञानिक पुरावे किंवा क्लिनिकल संशोधन उपलब्ध नाही. ''दमा ही श्वसनमार्गाची जळजळ आणि अरुंद होणे याद्वारे वैशिष्ट्यीकृत एक तीव्र श्वसन स्थिती आहे आणि त्याच्या उपचारांमध्ये सामान्यतः इनहेलर, कॉर्टिकोस्टिरॉईड्स व इतर औषधे समाविष्ट असतात; जी सूज कमी करतात आणि वायुमार्ग उघडतात.''

### 'फिश प्रसादम'चे धोके

**ॲलर्जीक प्रतिक्रिया :** काही दम्याच्या रुग्णांना सीफूडची ॲलर्जी असू शकते; ज्यामुळे गंभीर ॲलर्जीक प्रतिक्रिया होऊ शकतात आणि दम्याची लक्षणे वाढू शकतात.

**संसर्गाचा धोका :** माशांचा प्रसाद देण्याची पद्धत; ज्यामध्ये जिवंत मासा गिळला जातो. त्यामुळे स्वच्छतेबाबतची चिंता निर्माण होते. हातमोजे आणि इतर स्वच्छताविषयक उपाय न वापरण्याच्या सरावामुळे संसर्गाचा धोका होऊ शकतो.

**गॅस्ट्रोइंटेस्टायनल धोके :** जिवंत मासे गिळल्यामुळे गॅस्ट्रोइंटेस्टायनल ट्रॅक्टला संभाव्य हानी होऊ शकते. त्यामुळे गुदमरणे किंवा गॅस्ट्रोइंटेस्टायनल त्रास यांसारख्या गुंतागुंतीचा त्रास होऊ शकतात.

शेवटी ''दम्याच्या रुग्णांना पुराव्यावर आधारित वैद्यकीय उपचारांचे पालन करण्याचा, तसेच कोणत्याही पर्यायी उपायांचा विचार करण्यापूर्वी त्यांच्या आरोग्य सेवा प्रदात्यांशी सल्लामसलत करण्याचा सल्ला देतो,'' असे डॉ. शिवकुमार ठामपणे सांगतात. ■

# 'रंगीत' चित्रपट अल्ट्रा झकास ओटीटीवर प्रदर्शित

आयुष्य जेव्हा रंगीत असतं, तेव्हा प्रेमात आलेला विरह म्हणजे अपघाताने कॅनवासवर पडलेला काळा रंग. अशा या विरहामागे एक रहस्यमय घटना असेल तर? एक रहस्यमय आणि रंगहीन घटना 'रंगीत' या चित्रपटात दडून बसली आहे, जी प्रेक्षकांच्या अंगावर काटा आणणारी आहे. 'रंगीत' दिनांक १७ मे २०२४ रोजी थेट 'अल्ट्रा झकास' या मराठी ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे. प्रेक्षकांना आजवर न मिळालेल्या एका थरारक चित्रपटाचा मनमुराद आस्वाद घेता येणार आहे.

चित्रपटाची कथा एका फाईन आर्ट्स महाविद्यालयाच्या आवारात फिरते. विरहाच्या नैराश्येमुळे कायम नशेत असणारा सिद्धार्थ महाविद्यालयच्या आवारात फिरत आहे. महाविद्यालयात नव्यानेच प्रवेश घेतलेल्या शिवाला आवारात एका स्त्रीच्या आत्म्याचा भास होत आहे. आत्म्याचा आणि सिद्धार्थच्या प्रियसीचा चेहरा एकच असल्याचं लक्षात येतं. पण त्याला अचानक सोडून गेलेली प्रियसी मरण पावली कशी याचा शोध सुरू होतो. तिच्या मरणाचं कारण भयंकर असून त्यामागील रहस्यमय कथा प्रेक्षकांना चित्रपटात पहायला मिळणार आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन प्रज्योत दिवाकरराव कडू यांनी केले असून मकरंद अनासपूरे, सयाजी शिंदे, भूषण प्रधान आणि प्रार्थना बेहेरे या स्टार अभिनेत्यांनी चित्रपटात आपल्या अनोख्या भूमिका साकार केल्या आहेत.

''मराठी मातीतल्या चित्रपटांमध्ये अनेकानेक प्रयोग व्हावेत असं नेहमी वाटतं. अशाच एका प्रयोगातून जन्मलेला हा 'रंगीत' चित्रपट प्रेक्षकांना नक्कीच मनोरंजनाच्या शिखरावर पोहचवेल याची शास्वती वाटते. म्हणून 'रंगीत' सारखा चित्रपट थेट अल्ट्रा झकास ओटीटीवर प्रदर्शित करत आहोत.'' असे अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रा. लिमिटेडचे सी.ई.ओ. श्री. सुशीलकुमार अग्रवाल म्हणाले.




मुख्यमंत्री शिंदे व परिवार

नरेश म्हस्के व परिवार

संपादक चंद्रकांत भोईटे व परिवार

राजन विचारे व परिवार

आ. संजय केळकर व परिवार

आ. आव्हाड व परिवार

बाल्या मामा व परिवार

प्रताप सरनाईक व परिवार

भिवंडी पालिका आयुक्त अजय वैद्य

# पनवेलमध्ये ३३ अवैध फलकांचे तोडकाम सुरू

**पनवेल : पनवेल महापालिका क्षेत्रात ३३ अवैध फलक मागील अनेक महिन्यांपासून आणि वर्षांपासून उभारले होते. यापूर्वीच्या महापालिका प्रशासनाने याबाबत कोणतीही भूमिका न घेतल्याने अवैध फलकांमुळे महापालिकेचा मोठा महसूल बुडाला आहे. मुंबई येथील फलकाच्या दुर्घटनेतील जीवितहानीनंतर फलकांचे तोडकाम पनवेल महापालिकेने हाती घेतले आहे.**

## सर्वेक्षणात ३३ फलक हे विना परवानगी

पनवेल महापालिकेमध्ये पालिकेने परवानगी दिलेले आणि पालिकेची परवानगी घेतल्यावर त्या परवानगीची नुतनीकरणाची मुदत संपलेले, स्ट्रक्चरल ऑडीट न केलेले असे ८७ फलक पालिका क्षेत्रात आहेत. या फलकांना पालिका उपायुक्त मारुती गायकवाड यांनी नोटीस बजावून सात दिवसात फलक उभारलेल्या कंपन्या अथवा खासगी व्यक्तींनी पुढील सात दिवसात फलकाच्या मनोऱ्याचे स्ट्रक्चरल ऑडीट अहवाल व्हीजेटीआयकडून सादर करण्याची सूचना केली आहे. या दरम्यान पालिकेने सर्वेक्षण करुन पालिका क्षेत्रात किती अवैध फलक आहेत याची माहिती घेतली.

पालिकेच्या सर्वेक्षणात ३३ फलक हे विना परवानगी उभारण्यात आले असल्याचे निष्पन्न झाले. फलक लावणारा व्यापारी, पालिकेतील काही अधिकारी, स्थानिक गुंड आणि लोकप्रतिनिधी यांच्या संगनमतातून हा अवैध व्यवसाय सूरु आहे. यापूर्वी सुद्धा पालिकेने अवैध फलकांवर कारवाईचा बडगा उघारला मात्र पालिकेचे वार्ड अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे हे अवैध फलक उभारण्यात आले होते. पालिकेचे आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांच्या सूचनेनंतर उपायुक्त मारुती गायकवाड यांनी सोमवार ते बुधवारपर्यंत ३३ अवैध फलक तोडण्यासाठी पथक नेमले आहेत. उपायुक्त गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार सर्वाधिक अवैध फलक हे तळोजा परिसरात आहेत.

# अनेक मतदारांची नावे यादीतून गायब

## कल्याण लोकसभा शहरी, ग्रामीण भागात मतदार स्वयंस्फूर्तीने रांगेत

**कल्याण : कल्याण लोकसभा मतदार संघातील शहरी, ग्रामीण भागात पक्षीय कार्यकर्त्यांनी दारात येण्यापूर्वीच मतदारांनी सकाळपासून मतदान केंद्राबाहेर स्वयंस्फूर्तीने रांगा लावल्या होत्या. उन्हाचा चटका टाळण्यासाठी नागरिक विशेषत ज्येष्ठ नागरिक, आजी, आजोबा सकाळीच हातातील कापडी पिशवीत मतदान केंद्रावर लागणारे निवडणूक ओळखपत्र, आधारकार्ड, सोबत पाण्याची बाटली घेऊन मतदानासाठी दाखल झाले होते.**

सरकारी, निमसरकारी कार्यालये, खासगी आस्थापनांना शासनाने निवडणुकीनिमित्त विशेष सुट्टी दिल्याने नोकरदार वर्ग कुटुंबीयांसह मतदान केंद्रावर दाखल झाले होते. सकाळची वेळ असूनही हवेतील आद्रतेमुळे घामाच्या धारांनी मतदार नागरिक ओथंबून गेले होते. उन्ह होण्याच्या आत मतदान करू या विचारातून प्रत्येक मतदार घराबाहेर पडल्याने पावणे सात वाजल्यापासून नागरिक कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ भागात मतदान केंद्रांबाहेर रांगा लावून होते. उल्हासनगर, कळवा मुंब्रा भागात व्यापारी वर्ग अधिक आहे. त्यामुळे या भागात तसेच, कल्याण ग्रामीण भागात सकाळी दहा वाजल्यानंतर मतदार केंद्रांवर गर्दी दिसू लागली.

मतदान केंद्रांवर अपंग, ज्येष्ठ नागरिक, वृध्द, अंध, विशेष व्याधीग्रस्तांना मतदान करण्याची तातडीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत होती. प्रत्येक केंद्राबाहेर पाणी, आसन व्यवस्थान करण्यात आली होती. काही केंद्रांच्या बाहेर सेल्फी पॉईंट तयार करण्यात आले होते. मतदाना नंतर नवतरूण मतदार, वयोवृध्द मंडळी सेल्फी पॉईंटमध्ये येऊन स्वतःची प्रतिमा काढत होते. मतदान केल्याचा उत्साह नवतरूण मतदारांच्या चेहऱ्यावर होता.

शासनाने मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा यावेळी चांगला परिणाम झाल्याचे दिसून आले. पक्षीय कार्यकर्त्यांची वाट न पाहता किंवा घरी मतदार क्रमांकाची पावती आली नसली तरी मतदार स्वतःहून केंद्रावर दाखल झाले होते.

डोंबिवली कल्याणमधील मतदार सकाळी पावणे सात वाजल्यापासून मतदान केंद्राबाहेर मतदानासाठी रांगा लावून होते. डोंबिवली पूर्व भागात सीकेपी सभागृहातील मतदान यंत्रात बिघाड झाल्याने येथील केंद्र पावणे आठ वाजता मतदानासाठी सज्ज झाले. तोपर्यंत या केंद्राबाहेर मतदारांच्या रांगा लागल्या होत्या. मंजुनाथ शाळेतील एका यंत्रात बिघाड झाला. तो तातडीने दुरुस्त करून मतदान प्रक्रिया सुरू करण्यात आली. कल्याण, डोंबिवलीतील सुमारे ६० हजाराहून अधिक एमटी अनुक्रमिकेतील मतदारांनी नावे गायब असल्याची चर्चा राजकीय पदाधिकारी करत होते. या वृत्ताला शासकीय दुजोरा मिळाला नाही. मागील अनेक वर्ष मतदार करणाऱ्या अनेक मतदारांची नावे यावेळी मतदार यादीतून गायब आहेत. एकाच घरातील मुलांची नावे यादीत आहेत पण आई-बाबांची नावे वगळण्यात आली आहेत. यामुळे अनेक मतदार संतप्त आहेत.

डोंबिवलीतील मोठागाव शाळा क्रमांक २० येथे मतदान केंद्र ३६ वर एका मतदाराला चक्कर आली. त्याच्यावर तातडीने अत्यावश्यक उपचार करण्यात आले. या मतदाराने मतदान न करताच केंद्रातून काढता पाय घेतला. मतदान केंद्रांच्या बाहेर मतदारांचे यादीतील अनुक्रमांक शोधण्यासाठी पक्षीय कार्यकर्ते पहाटे पासून बसले होते.

कल्याणमध्ये वायेलनगर भागात एका तरूणीचे नाव यादीत नव्हते. मतदान न केल्यास कर्मचाऱ्यांचे तीन दिवसांचे वेतन कापण्याची तंबी कार्यालयाने दिल्याने ही तरूण अस्वस्थ होती. यादीत नाव नसलेले मतदार विविध केंद्रांवर जाऊन आपले नाव कोणत्या यादीत आहे का याचा शोध घेत होते.

### *विदेशातून भारतात*

*इंग्लंडमध्ये निवास असलेले पर्जन्य तज्ज्ञ लक्ष्मीकांत आणि निलीमा चिमोटे या दाम्पत्याने खास निवडणुकीसाठी भारतात येऊन डोंबिवलीतील केंद्रावर अरूणोदय स्वामी शाळा, डॉन बॉस्को केंद्रावर मतदान केले. १९५२ पासून प्रत्येक निवडणुकीत मतदान करणाऱ्या डोंबिवलीतील संस्कृत अभ्यासक सुमित्रा गुर्जर (९०) यांनी स. वा. जोशी शाळेत, कल्याणमधील डॉ. सारंगधर (९६),मधुकर काळे (९८) यांनी १९५२ पासून मतदान केले आहे. सज्ञान झाल्यापासून मतदानाचा प्रत्येक वेळी हक्क बजावणारे शीतल आणि शशांक देशपांडे यांचीही नावे यादीत गायब होती. माजी खासदार राम कापसे यांचे चिरंजीव डॉ. आनंद, स्नुषा जान्हवी, काक हरदास यांच्या काही कुटुंबीयांचीही नावे मतदार यादीतून गायब आहेत.*

### *मुंब्रा-ग्रामीणमध्ये शांतता*

*कल्याण ग्रामीण मतदारसंघातील कळवा-मुंब्रा, ग्रामीण भागातील मतदार शांतपणे रांगा लावून मतदान करत होते. मुंब्रातील प्रत्येक केंद्रावर सकाळपासून महिला पुरूषांच्या रांगा लागल्या होत्या. २७ गावे, १४ गावांमध्ये झाडाखालील सावलीत बसून ग्रामस्थ मतदारांना यादीतील क्रमांकाची माहिती देत होते. मलंगपट्टी, अंबरनाथ ग्रामीण भागात केंद्रांबाहेर रांगा लागल्या होत्या. पाली-चिरड-पोसरी केंद्रावर शांततेत मतदान सुरू असल्याचे पोलीस पाटील नितीन ठाकरे यांनी दिली.*

### *नेते गायब*

*कल्याण लोकसभा मतदारसंघात यापूर्वी निवडणुकीच्यावेळी रस्त्यावर दिसणारी आमदार, खासदार, पक्षीय नेते यांची मतदान टक्का वाढविण्यासाठीची धावपळ यावेळी दिसत नव्हती. कल्याण पूर्वेत भाजप आमदार गणपत गायकवाड यांच्या कार्यालयाबाहेर निवडणूक असली की तुफान गर्दी असायची. सोमवारी गायकवाड यांच्या कार्यालयाबाहेर शुकशुकाट होता. शहरप्रमुख महेश गायकवाड मतदारांना पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील होते. सर्व पक्षीय माजी नगरसेवक, पदाधिकारी मात्र आपल्या मतदार केंद्रात ठिय्या मांडून होते.*

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत महापालिकेमध्ये

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ट्युलिप इंटर्नशिप पत्राचे वाटप



पनवेल :आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ भारत अभियान अंतर्गत महापालिकेच्या घनकचरा व स्वच्छता विभागामध्ये अर्थात द अर्बन लर्निंग इंटर्नशिप प्रोग्रॅम राबविला जात आहे. ट्युलिप हा केंद्र शासनाचा उपक्रम असून विद्यार्थ्यांना शहरी प्रश्नांची जाणीव व्हावी व महापालिका करत असलेल्या कामाचे स्वरूप समजवून घेऊन आपल्या नवनवीन संकल्पना राबविण्याविषयी प्रोत्साहन देण्यात येत असते. या ट्युलिप कार्यक्रमांतर्गत महापालिकेच्यावतीने ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते. यामध्ये पिल्लई इंजिनिअरींग कॉलेजचे सात व सरस्वती इंजिनिअरींग महाविद्यालयाच्या एका विद्यार्थ्यांची निवड महापालिकेने केली आहे. उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या हस्ते या विद्यार्थ्यांना आज इंटर्नशिप पत्राचे वाटप करण्यात आले.

यावेळी घनकचरा व आरोग्य विभागाचे विभागप्रमुख अनिल कोकरे, पर्यावरण विभागाचे विभाग प्रमुख मनोज चव्हाण, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

विद्यार्थ्यामध्ये कार्यात्मक कौशल्ये वाढविणे आणि त्यांच्या ऊर्जा व कल्पनांचा उपयोग करून शहरांच्या भविष्यासाठी उपाय तयार करण्यासाठी सहनिर्मिती करणे, स्थानिक स्वराज्य संस्थेच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रम, आव्हाने यामध्ये विद्यार्थी पर्यायाने तरूण वर्गाचा सहभाग वाढविण्यासाठी ही ट्युलिप कार्यक्रमाची संकल्पना सुरू करण्यात आली आहे. या कार्यक्रमांतर्गत कार्यक्रमांतर्गत पिल्लई इंजिनिअरींग कॉलेज व सरस्वती इंजिनिअरींग महाविद्यालयाचे विद्यार्थी एक महिना महापालिकेच्या स्वच्छ भारत अभियानाचे काम पहाणार आहेत.

या एक महिन्यामध्ये विविध सोसायट्यांमध्ये जाऊन कचरा वर्गीकरण व घरातील कचऱ्यापासून खत निमिर्ती करण्याविषयी हे विद्यार्थी जनजागृती करणार आहेत. तसेच शाळा सुरू झाल्यानंतर विविध शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांमध्ये कचरा वर्गीकरण,त्यांचा पुर्नवापर, खत निर्मिती या विषयांवरती माहिती देणार आहेत.

इंटर्नशिप पुर्ण झाल्यानंतर या विद्यार्थ्यांना महापालिकेच्यावतीने प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या प्रमाणपत्राचा उपयोग विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यामध्ये त्यांच्या नोकरीमध्ये, व्यवसायामध्ये होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी केले आहे.

# सकाळच्या प्रहरात अनेक ठिकाणी मतदानास उत्स्फूर्त प्रतिसाद

## सात वाजण्यापूर्वीच नाईक परिवारांचे मतदान

नवी मुंबई : ठाणे जिल्हा लोकसभा निवडणूक मतदान सुरु झाले असून अनेक ठिकाणी मतदारांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. आज सकाळी सात वाजण्याच्या पूर्वीच ऐरोलीचे आमदार गणेश नाईक हे मतदानस्थळी सह कुटुंब उपस्थित झाले होते. सकाळच्या सत्रात नाईक कुटुंबाने मतदानाचा हक्क बजावला आहे. तसेच बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनीही मतदानाचा हक्क बजावला आहे.

लोकसभा निवडणुकीच्या राज्यातील अंतिम टप्प्यातील मतदान आज होत असून नवी मुंबईत अनेक ठिकाणच्या मतदार केंद्रावर मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. दुपारी अति तीव्र उन्हाच्या झळा लागत असल्याने सकाळी सकाळी मतदान करावे या हेतूने अनेकजण आलेले आहेत. ठाणे लोकसभा मतदार संघात एकूण २५ लाख ८ हजार ७१ मतदार असून त्यात महिला ११ लाख ५९ हजार दोन आणि पुरुष मतदार १३ लाख ४८ हजार १६३ मतदार असून या शिवाय २०७ तृतीय पंथी तर ७०० सेवा मतदार आहेत.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१